ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# महिलांचा आर्थिक सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी स्वयं सहायता गटाची भूमिका - एक अध्ययन

**प्रा.सुजाता साखरे**
दयानंद आर्य कन्या महाविद्यालय,
जरीपटका, नागपूर.

अन्न, वस्त्र व निवारा या मनुष्याच्या प्राथमिक गरजा आहेत. मनुष्य हा सामाजिक प्राणी असल्याने समुहासोबत निवासामध्ये राहतो. निवासाची गरज मनुष्य आपल्या कष्टाने पूर्ण करतो.प्राथमिक अवस्थेत मनुष्य झोपडी टाकून राहत होता. त्यानंतर निरनिराळया प्रकारचे घरे बांधून निवास करू लागला. त्यावेळी मनुष्याची जशी ऐपत असेल त्याप्रमाणे घर तयार करू लागला. पुढे तर घर बांधणीचे शास्त्र म्हणजे वास्तुशास्त्र तयार झाले. यामध्ये आपल्या आवश्यक गरजा बरोबर आवडी निवडीनुसार तसेच ऐपतीनुसार वेगवेगळया घराची निवड होऊ लागली वर्तमान काळात, धकाधकीच्या जीवनात मनुष्याला काही काम स्वतः करणे शक्य होत नाही. घराचे कार्य तर अत्यंत क्लिष्ट गोष्ट झालेली आहे. कामाच्या व्यस्ततेमुळे मनुष्य स्वतः घर बांधणीच्या कामाकडे लक्ष देऊ शकत नाही. यामधुनच वास्तु निर्माण करणारे बिल्डर आणि व्यावसायिक यांची निर्मिती झाली. याच आधारावर घराच्या बांधणीची जबाबदारी शासनाने स्वतः घेतली यामधुनच म्हाडासारख्या संस्थाची निर्मिती करण्यात आली. शासनामार्फत गठन केलेल्या या मंडळाकडून निवासाची पूर्ती करण्यात आली. यामध्ये त्यांच्या ठरलेल्या नियमानुसार आर्थिक स्तरावर गट विभाजन करण्यात आले. यात निम्न, मध्यम, आणि उच्च उत्पन्न गटानुसार निवासाचे विभाजन करण्यात आलेले आहे. शेकडो निवासाची पूर्तता आजपर्यन्त झालेली आहे. शासनाने समाजातील लोकांसाठी निवासाची व्यवस्था तर केली पण या ठिकाणी सुविधा बरोबरच असुविधा सुध्दा दिसून येतात याबाबतचे अध्ययन गृहअर्थशास्त्र या विषयाच्या अनुषंगाने होणे गरजेचे आहे. परंतु आतापर्यन्त या प्रकारचे अध्ययन झाल्याचे आढळून आलेले नाही. समाजातील या सुविधाचा लाभ घेतलेल्या लोकांचे समाधान, कुतुहल जाणून घेण्याच्या उद्देश्याने या विषयावर अध्ययन होणे ''गृह'' म्हणजे कुंटुब सदस्याच्या निवासासाठी बांधलेली वास्तु. मानवी संस्कृती मध्ये गृहसंस्थेला अनन्यसाधारण महत्व आहे ''वास्तु'' या शब्दाचा अर्थ घर बांधण्यासाठी जागा असा होता. परंतु कालांतराने त्याला राहण्याचे घर असा अर्थ प्राप्त झाला. स्वतःचे घर असावे ही प्रत्येक व्यक्तीची अपेक्षा असते. परंतु प्रत्येक घराचा आराखडा मात्र भिन्न स्वरूपाचा असतो. म्हणून घराची संकल्पना सर्व देशात सार्वत्रिक स्वरूपाची आहे, असे म्हटले जाते. स्वतःचे घर असल्याने समाजात व्यक्तीला विशिष्ट दर्जा प्राप्त होतोगरजेचे वाटले म्हणून प्रस्तुत विषयांची निवड करण्यात आली.

1. निवारा आणि घर या वेगळया संकल्पना आहेत.
2. निवारा ही अशी वास्तु असते की जिथे मानवाला काही बाबतीत संरक्षण मिळते.
3. जेव्हा एखादया वास्तुत कुंटुबाचा निवास असतो त्याला घर म्हणतात.
4. 'घर' या ठिकाणी कुंटुबातील सदस्य सामुहिकरित्या सुखकर जीवन व्यतीत करतात.
5. तेथे जीवनातील वैशिष्टपूर्ण क्षण साजरे केले जाते सर्व सदस्या मध्ये भावनात्मक जवळीक असते. त्यांच्या गरजा परिपूर्ण केल्या जातात.
6. 'घर' आणि ' कुंटुब' यात एकात्मता असते.

सामुदायिक जीवनापासून वेगळे कुंटुब निर्माण झाल्यानंतर प्रत्येक कुटुंबाला स्वतंत्र निवासस्थानाची आवश्यकता भासू लागली. 'जितके कुटुंब तितके निवास'. आज वाढत्या लोकसंख्येमुळे घरांची गरजही वाढली आहे आणि त्यातूनच घराचा मोठा प्रश्न कुटुंबाला भासत आहे. अशा परिस्थितीमध्ये जेव्हा तयार घर मिळते. तेव्हा कुटुबाला निश्चितच स्वर्ग मिळाल्याचा आनंद मिळते

1. निवारा आणि घर या वेगळया संकल्पना आहेत.

2. निवारा ही अशी वास्तु असते की जिथे मानवाला काही बाबतीत संरक्षण मिळते.

3. जेव्हा एखादया वास्तुत कुंटुबाचा निवास असतो त्याला घर म्हणतात.

4. 'घर' या ठिकाणी कुंटुबातील सदस्य सामुहिकरित्या सुखकर जीवन व्यतीत करतात.

5. तेथे जीवनातील वैशिष्टपूर्ण क्षण साजरे केले जाते सर्व सदस्या मध्ये भावनात्मक जवळीक असते. त्यांच्या गरजा परिपूर्ण केल्या जातात.

6. 'घर' आणि ' कुंटुब' यात एकात्मता असते.

सामुदायिक जीवनापासून वेगळे कुंटुब निर्माण झाल्यानंतर प्रत्येक कुटुबांला स्वतंत्र निवासस्थानाची आवश्यकता भासू लागली. 'जितके कुटुंब तितके निवास'. आज वाढत्या लोकसंख्येमुळे घरांची गरजही वाढली आहे आणि त्यातूनच घराचा मोठा प्रश्न कुटुबांला भासत आहे. अशा परिस्थितीमध्ये जेव्हा तयार घर मिळते. तेव्हा कुटुबाला निश्चितच स्वर्ग मिळाल्याचा आनंद मिळते

**गृहआयोजनाचे सिध्दांत :-**

| | |
|---|---|
| घराची अभिमुखता | खोल्यांचे सामुहिकीकरण |
| प्रशस्तता | संसरण |
| एकांत | दिषास्थिती |
| फर्निचर | स्वच्छता |
| मितव्ययता | बाहयस्वरूप |

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ :**

**म्हाडा संस्थेची पार्श्वभूमि :**

सामान्य नागरिकांच्या मूलभूत गरजांपैकी निवासाच्या गरजांची पूर्तता करण्याकरिता शासनाने एक मंडळ गठित केलेले आहे. ग्रामीण भागातून निरनिराळया उद्देशाने शहराकडे वाटचाल करणाऱ्या नागरिकांची संख्या असंख्य होत आहे. बहुसंख्येने कामगार तर शहराकडे धाव घेतातच तसेच नोकरदार वर्ग नोकरीच्या निमित्ताने शहरात वास्तव्य करीत आहे. शासकिय निवासाची सोय मर्यादित आहे. भाडेतत्वावर निवास मिळणे सुध्दा कठिण जाते अशावेळी नागरिकांना स्वतःचे हक्काचे निवास देण्याची जबाबदारी या मंडळाने स्विकारलेली आहे. राज्यशासन गठित या मंडळाला ''महाराष्ट्र हाऊसिंग अँड एरिया डेवल्पमेंट ऑथरिटी'' असे संबोधिले जाते. ही संस्था ''म्हाडा'' या नावाने परिचीत टाहे प्रारंभी निवासाची व्यवस्था करणारी संस्था महाराष्ट्र राज्य स्तरावर जी करण्यात आली तिला ''महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड मुंबई'' या नावाने प्रसिध्द होती. 1948 साली या मंडळाची स्थापना करण्यात आली. त्यावेळी विदर्भाचा समावेश नव्हता हे बोर्ड निवासाकरिता अनेक हाऊसिंग स्किम्स (योजना) करीत होते. यामध्ये जागेची निवड, जागा घेण्याची प्रक्रिया, निवासाची आखणी, निवास गाळे तयार करणे, गाळयांची विक्री करणे, विभाजन व वाटप करणे तसेच वाटपांनंतरची कार्यपूर्ती इत्यादी कार्ये हे बोर्ड करीत होते.

त्याचप्रकारच्या कार्याचा वाढता व्याप पाहून बोर्ड विस्तारित करण्यात आले. नंतर 1960 मध्ये राज्य व विदर्भ स्तरावर विदर्भ हाऊसिंग बोर्ड गठन करण्यात आलेजुन्या झालेल्या इमारतीचे नुतनीकरणाचे कार्य ही या मंडळाने हाती घेतले. 1971मध्ये नुतनीकरणाची कामे करणारे ''बाम्बे बिल्डींग रिपेअर बोर्ड'' तयार करण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र स्लम इम्प्रुव्हमेंट बोर्ड 1974 साली निर्माण केले. या अंतर्गत पाणी, रस्ते, शौचालय, वीज, रस्त्यावरील पथदिवे, यांचीही व्यवस्था पाहण्याचे काम करू लागले ही विस्तारलेली कामे करण्याकरिता मंडळाचे विस्तारीकरण करण्यात आले. या मंडळाचे रितसर सभासद व कार्यकरिणी गठण करण्यात आली.

**''म्हाडा'' स्वरूपात शासकीय संस्था :**

महाराष्ट्र राज्य हाऊसिंग बोर्ड हे मंडळ ''महाराष्ट्र हाऊसिंग ॲण्ड एरिया डेवल्पमेंट अथॉरिटी ''म्हाडा'' या नावाची संस्था म्हणून नावारूपास आली. संस्थेची निर्मिती 1977 मध्ये झाली. यात ध्यये, धोरण व नियमबध्द करण्यात आले. महाराष्ट्र परपज सेक्शन - 41 - म्हाडा ॲक्ट 1976 अन्वये यात एक अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि काही सभासद असतात. ते अर्धवेळ कार्यरत असतात. मुख्य कार्यकारी अभियंता हेच मानद उपाध्यक्ष असतात. मंडळाचे कार्य करण्याची जबाबदारी सामुहिकरित्या पार पाडतातनागरिकांच्या राहण्याचा प्रश्न सोडविणारी संस्था म्हणून याकडे पाहिले जाते. अनेक गरजुच्या निवासाच्या समस्या यामाध्यमातून सोडविण्यांत आल्या आहेत. निवासाकरिता जागाचे

नियोजन म्हाडा करित आहे. शेकडो एकर जमीन म्हाडाने हस्तगत केलेली आहे. नियमाने व शासकिय स्तरावर धोरणांचा अवलंब करून म्हाडाने जागा मिळविण्यांत यश प्राप्त केले. म्हाडाचा अंतर्गत नियम व धोरणाचा संबंध अन्य संस्थाशी येतो. त्यामध्ये एन.आय.टी व महानगरपालिका यांच्याशी सहकार्य व तडजोडीने कार्य साध्य केले जाते. नागपुर, अमरावती, औरगाबाद, नाशिक, पुणे कोकण व मुंबई याप्रमाणे विभागवार निवासरचना आखलेल्या आहेत. सध्या नऊ विभागाचे कार्य होत आहे. या अंतर्गत नागरिकांच्या आर्थिक स्तरानुसार तसेच नोकरदार कामगार व सामान्य नागरिक अशा प्रकारे निवासी गाळयांचे प्रकार करण्यात येतात. वेगवेगळया स्थळांचे निरीक्षण करून गरजेनुसार जागेची निवड करतात. जागा निवडीनंतर ते बांधकामाचे प्रयोजन पुरवितात. काही ठिकाणी त्यांच्या जुन्या इमारतीचे नुतनीकरणाचेही कार्य करतात.

**म्हाडाचे उददेश्य :**

1 ) घरे बांधणे आणि ते निम्न, मध्यम व उच्च उत्पन्न गटातील लोकांना त्यांच्या मिळकतीनुसार निवास देते.

2 ) प्लॉट विकास करुन देणे अर्थात प्लॉट ला मिळवुन देण्याचे मुख्य कार्य म्हाडा ही संस्था करीत असते.

3 ) रस्ते, पाणी सुविधा व विद्युत सोय गाळयापर्यन्त उपलब्ध करुन देते.

4 ) व्यापारी संकुल, समाज मंदीर इत्यादी सोयी म्हाडा आपल्या गाळे धारकांना उपलब्ध करुन देते.

5 ) म्हाडाच्या गाळे संकुलामध्ये खाजगी दवाखान्याची सोय करुन देते.

6 ) Special planning authority च्या अंतर्गत नविन वसाहती निर्माण करते.

7 ) म्हाडा ही संस्था विविधयोजना राबविण्यासाठी आर्थिक सहाय्यता HUDCO, LIC, GIC आणि शासनाकडून गाळे धारकाला उपलब्ध करवून देते Housing Scheme

1 . शहरी गाळे

2 . शहरी विकास

3 . क्षेत्रातील घरे बांधणे ( जसे -: लोक आवास योजना ,स्लम रिडेव्हलेपमेंट)

4 . गाळयाला पुन्हा-पुन्हा व्यवस्थित (रिपेरिंग) करण्याचे कार्य केले जाते.

5 . गाळे बांधण्यासाठी जागेचे अधिग्रहण सरकार द्वारे केले जाते.

6 . राष्ट्रीय घरकुल योजना सोय आर्थिक दुर्बलांकरीता 13 लाख ग्रामीणंसाठी 7 लाख, शहरी लोंकांना 20 लाख घर बांधुन दिली आहेत.

7 . निम्न, मध्यम व उच्च आर्थिक स्तरातील लोकांना त्याच्या उत्पन्नानुसार गाळे तयार करुन वितरीत करतेनिम्न, मध्यम व उच्च आर्थिक समुहासाठी म्हाडानीं महाराष्ट्रात बरीच घरे बांधून दिली त्याआधी म्हाडानी महाराष्ट्रातील मोठया शहरात जागा विकत घेवून उच्च, मध्यम आणि निम्न आर्थिक कुटुबांसाठी गृहयोजना राबविल्या आहेत. National Housing Agenda च्या अंतर्गत म्हाडानी 20,00,000 घरे बांधण्याचे ठरविले होते आणि त्याची नविन टप्यात अमंलबजावणी करण्यात आली

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

प्रस्तुत संशोधनामध्ये खालील उद्दिष्टांचा समावेश करण्यात आला होता.

1) म्हाडाचे निम्न, मध्यम उत्पन्न गटातील गाळे गृहआयोजन सिध्दांतानुसार आहे किंवा नाही, हयाचे अध्ययन करणे.

2) म्हाडाच्या निम्न, मध्यम उत्पन्न गटातील कुटुंबाच्या शैक्षणिक गरजा पूर्ण होत आहे किंवा नाही, हयाचे अध्ययन करणे.

3) म्हाडाच्या निम्न, मध्यम उत्पन्न गटातील कुटुंबाच्या मनोरंजनात्मक गरजा पूर्ण होत आहेत किंवा नाही, हयाचे अध्ययन करणे.

4 ) म्हाडाच्या निम्न, मध्यम उत्पन्न गटातील गाळयामध्ये स्वच्छता ही गरज पूर्ण होत आहे किंवा नाही, हयाचे अध्ययन करणे.

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

**गृहीतके :-**

संशोधनाचे हेतू विचारात घेवुन खालील गृहीतकांची मांडणी प्रस्तुत संशोधनात करण्यात आली.

1 ) 'म्हाडा' या शासकीय संस्थेने निम्न, मध्यम उत्पन्न गटातील कुटुंबाची निवासाची गरज भागविली आहे.

2 ) म्हाडाचे मध्यम उत्पन्न गटातील गाळे हे गृहआयोजन सिध्दांताप्रमाणे असतात.

3 ) म्हाडाच्या निम्न, मध्यम उत्पन्न गटातील गाळयांमध्ये स्वच्छता या सिध्दांताचा अभाव आढळतो.

4 ) प्रकाश व वायुविजन या सोयीचा म्हाडाच्या निम्न, मध्यम उत्पन्न गटातील गाळयांमध्ये अभाव आढळतो.

5 ) म्हाडाच्या निम्न, मध्यम उत्पन्न गटातील गाळयाजवळ शाळा, कॉलेज असतात.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :**

प्रस्तुत संशोधनाकरिता नागपूरातील म्हाडाच्या निम्न व मध्यम उत्पन्न गटातील गाळेधारकांचा समावेश करण्यात आला

**साहित्याचा आढावा**

1) Ghanekar V (1970)

Co-operative Housing in Pune City.

वरील संशोधनामध्ये गृहसोसायटीतील समस्यांचे अध्ययन केलेले आहे. सोसायटी मधील अडचणींचे योग्य निराकरण करून समाधानी राहणे, प्रत्येकांनी सामंजस्य दाखवून अडचणींना सामोरे जाणे आवश्यक आहे असे निदर्शनास आले.

2) P State housing Corporation Limited (APSHCL) 1979 ही संस्था मुख्यतः गरीबी रेषे खालील ;ठच्स्द्ध कुटूंबाला स्वतःचे घर मिळावे यासाठी कार्य करते. हयात बी.पी.एल धारकांना आर्थिक आणि तांत्रिक अडचणी येवू नये याकडे ही संस्था विशेष लक्ष देते. ही संस्था गरीबी रेषे खालील कुटुंबासाठी अनेक गृहयोजना राबवित आहे.

3) जैन राजश्री (1979) ''नागपुर शहरातील घरांमधील सुविधांच्या समाधानाचे अध्ययन''

रा.तु.म. नागपुर विद्यापीठ नागपुर हया त्यांच्या संशोधनामध्ये असे लक्षात आले की सर्व कुटुंब जे सरकारी निमसरकारी गाळयांमध्ये राहतात आणि ज्यांचे स्वतःचे हक्काचे घर आहे असे कुटुंब आपल्या राहत्या घरात समाधानी आहेत. कारण त्यांना राहायला छत आहे असे बहुसंख्य गाळेधारक संतुष्ट आहेत.

**4) शर्मा (1989) :** ''फ्लैट मधील सुविधांचे अध्ययन'' हे संशोधन त्यांनी कलकत्ता विद्यापीठात सादर केले. त्यांच्या या संशोधनाद्वारे खालील निष्कर्ष लक्षात आले. फ्लॅट मधील प्रत्येक घर मालक दर महिन्याला देखरेख साठी निश्चित पैसे देतात व त्यामुळे रस्ता आणि परिसर स्वच्छ ठेवला जातो. परंतु त्या देखरेखीमध्ये अग्निशामक सोय केलेला नव्हती.

5) Limye Kshama (1995)

'Housing Condition in Nagpur City with reference to

Home Management' 643/ 71768,

प्रस्तुत शोध प्रबंध राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर येथे सादर केलेला आहे. त्यांनी या अध्ययनामध्ये नागपूर शहरातील घरांच्या स्थितीचे विस्ताराने अध्ययन केलेले आहे. त्यांना हे अध्ययनाद्वारे लक्षात आले की उत्पन्नामुळे घराचे आयोजन बदलत असून, आकार, विस्तार यात अंतर येतो, हे आढळून आले.

**6) जोशी ए.एस (1997)**

''कोल्हापूर शहरातील गृहनिर्माण संस्थेच्या कार्यप्रणालीचे अध्ययन'' कोल्हापुर विद्यापीठामध्ये वरील संबंध सादर केलेला आहे. संशोधनामध्ये निम्न निष्कर्ष मिळाले की गृहनिर्माण संस्थेला विकसित करण्यासाठी सरकार तसेच गृहकार्य उपलब्ध करणाऱ्या संस्थेनी सामान्य लोकांना योग्य ती सहायता करावी की जेणेकरून जनतेला त्याचा फायदा व्हावा. अर्थात सरकार आणि कर्ज देणाऱ्या संस्थेमध्ये समतोल असावा.

7) Mehra N. (1997)

Housing Co-operatives and Urban Co-Operative Books in Goa.

वरील संशोधनामध्ये असे दिसले की सोसायटी फंडाचा उपयोग

घराच्या सौदर्याकरिता योग्य ठिकाणी उपयोगात आणायला हवा. निवासा बद्दलच्या आवश्यकता सोसायटी फंडातून पूर्ण कराव्यात जेणेकरून फंडाचा योग्य उपयोग व्हायला हवा, असे निष्कर्ष निघाल

8)Lall S. (1997) "Housing Indicators and housing Co-operatives प्रस्तुत संशोधनामध्ये असे कळते की, हाऊसींग को ऑपरेटिव्ह चे योगदान घराची गुणवत्ता वाढविण्यासाठी तसेच घरांची संख्या वाढविण्यासाठी सुधारित मार्गाचा अवलंब करण्यात यावा.

9) George K. (2000) "Housing Finance for the Satаried Class in Kerala Its Impact on the Development of the state."

या अध्ययनातून असे दिसते की, घराचे बांधकाम करण्यासाठी पैशाची जुळवाजुळव अत्यंत महत्वपूर्ण बाब आहे आणि यासाठी वार्षिक बचत करून तसेच गृहकर्ज काढून आपली प्राथमिक गरज ते पूर्ण करतांना दिसतात.

10) Tiwari P. (2000) Housing Demand in Tokya : International real estate प्रस्तुत संशोधनामध्ये टोक्यो शहरातील घरांचे अध्ययन केलेले आहे. त्यात असे निष्कर्ष मिळाले की टोक्यो शहरातील सुंदर घरांना जास्त मागणी आहे आणि घरांची सुंदरता वाढविण्यासाठी तेथील लोक अधिक प्रयत्नशील असतात. तेथील लोक सतत आपली आर्थिक बाजू मजबूत करून मिळविलेले पैसे घराच्या बांधणीकरीता उपयोगात आणतात.

## संशोधन पध्दती

.'ज्ञान' संपादन करणे ही मानवाची मूलभूत प्रवृत्ती आहे. जगातील भौतिक गोष्टीचे ज्ञान प्राप्त करून मानव आपले जीवन सुखी व समृध्द बनविण्याचा प्रयत्न करीत आहे. मनुष्य आपल्या ज्ञानेंद्रियांचा उपयोग करून सभोवतालच्या वातावरणाचा अनुभव घेतो. प्रत्येक घटनेबाबत असे कां ? याची कारणे कोणती ? असे अनेक प्रश्न उपस्थित करून तर्क व बुध्दीच्या आधारावर त्यांची उत्तरे शोधून काढण्याचा प्रयत्न करतो म्हणूनच वस्तुनिष्ठ ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न केला जातो आणि त्यासाठी वस्तुनिष्ठ, अनुभवाधिष्ठित आणि वैज्ञानिक दृष्टिकोणाचा अंगीकार केला जातो. बदलत्या सामाजिक परिस्थितीचा व्यक्तीच्या वर्तनावर, मनोवृत्तीवर, कौशल्यावर, एकूणच सामाजिक परिस्थितीवर कशा प्रकारचा परिणाम होतो याचे ज्ञान संशोधनातून मिळत आहे. हे संशोधन वैज्ञानिक किंवा शास्त्रीय पध्दतीचे आहे. संशोधनाचा सरळ अर्थाने शोध घेणे, असा आहे. संशोधनामध्ये जिज्ञासेला अधिक प्राधान्य आहे. अधिकचे जाणून घेण्याची प्रकृती, या प्रकृतीतून जे जाणून घेतले त्याच्या प्रामाणिकतेचा पडताळा, अशुध्दला बाजूला सारून त्यातील शुध्दाचे दर्शन घडविणे याची अभिलाषा संशोधनात दडलेली आहे. संशोधनाला अभिव्यक्त करतांना शोध, अन्वेषण यांचा उपयोग केला आहे.सत्य शोधून काढणे हा संशोधनाचा उद्देश आहे. व्यवहारातील व सृष्टीतील विविध समस्या सोडविण्यासाठी सतत संशोधन करणे आवश्यक आहे. कोणतेही संशोधन हे कोणते तरी प्रश्न, समस्या, घटना, प्रवृत्ती अथवा व्यवहारांना घेऊन प्रारंभ केले जाते. संशोधनाचा संबंध प्रामुख्याने अधिक सामान्य, अमूर्त आणि कल्पीत समस्यांशी असते. यात संशोधन करून सिध्दांची मांडणी केली आहे. संशोधन हा केवळ एक शैक्षणिक उपक्रम नाही तर त्यातून काहीतरी नवीन शोधून काढण्याचा एक संकल्प आहे. एखादया प्रश्नाचे समाधानकारक उत्तर शोधण्यासाठी केलेल्या संशोधनातून अनेक दुसऱ्या अनपेक्षित समस्या निर्माण होतात आणि त्यासाठी पुन्हा-पुन्हा संशोधन करावे लागते. संशोधन हा सतत नव्याचा शोध घेण्याचा एक व्यवस्थित व संघटित असा प्रयत्न आहे.

सामाजिक संशोधनाची प्रक्रिया केवळ तथ्यांचे संकलन, वर्गीकरण व सारणीकरण एवढेच नाही तर त्या तथ्यांचे उचित विश्लेषण व निर्वचनही करावे लागते म्हणून सामाजिक संशोधनामध्ये तथ्यांचे विश्लेषण व निर्वचनाला महत्वाचे स्थान आहे. विषयाशी अनुरूप माहितीचे खालीलप्रमाणे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन करण्यात आले.

## सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन

सामाजिक संशोधनाची प्रक्रिया केवळ तथ्यांचे संकलन, वर्गीकरण व सारणीकरण एवढेच नाही तर त्या तथ्यांचे उचित विश्लेषण व निर्वचनही करावे लागते म्हणून सामाजिक संशोधनामध्ये तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचनाला महत्वाचे स्थान आहेविषयाशी अनुरूप माहितीचे खालीलप्रमाणे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन करण्यात आले.

मध्यम आणि निम्न उत्पन्न गटातील गाळेधारकांना गृहआयोजन

सिध्दांताची माहिती असलेल्यांचे सांख्यिकीय विश्लेषण

| | मध्यम गट | निम्न गट |
|---|---|---|
| मध्यमान | 2.45 | 1.56 |
| प्रमाण विचलन | 0.72 | 0.77 |
| विचलन विषमता | 29.20 | 49.09 |

उच्च, मध्यम आणि निम्न उत्पन्न गटातील गाळेधारकांच्या स्वयंपाक घराची दिशांचे सांख्यिकीय विश्लेषण

| | मध्यम गट | निम्न गट |
|---|---|---|
| मध्यमान | 2.20 | 1.80 |
| प्रमाण विचलन | 0.74 | 0.88 |
| विचलन विषमता | 33.62 | 48.69 |

उच्च, मध्यम आणि निम्न उत्पन्न गटातील गाळयामध्ये दरवाजांची संख्येचे सांख्यिकीय विश्लेषण

| | मध्यम गट | निम्न गट |
|---|---|---|
| मध्यमान | 2.24 | 1.76 |
| प्रमाण विचलन | 0.75 | 0.56 |
| विचलन विषमता | 33.70 | 33.01 |

उच्च, मध्यम आणि निम्न उत्पन्न गटातील गाळयामध्ये खिडक्यांचा सांख्यिकीय विश्लेषण

| | मध्यम गट | निम्न गट |
|---|---|---|
| मध्यमान | 2.30 | 1.76 |
| प्रमाण विचलन | 0.83 | 0.61 |
| विचलन विषमता | 36.02 | 34.79 |

उच्च, मध्यम आणि निम्न उत्पन्न गटातील गाळयांच्या बाहेरील दृश्यांचे सांख्यिकीय विश्लेषण

| | मध्यम गट | निम्न गट |
|---|---|---|
| मध्यमान | 2.10 | 1.96 |
| प्रमाण विचलन | 0.87 | 0.87 |
| विचलन विषमता | 41.63 | 44.59 |

प्राप्त परिणामाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की 'दृष्टिकोन' या गृहआयोजन सिध्दांतानुसार स्वयंपाक घराची दिशा पूर्वेकडे असावी परंतु निम्न, मध्यम उत्पन्न गटातील गाळयांचे स्वयंपाक घर पूर्वेकडे नाही. मध्यम आणि निम्न उत्पन्न गटातील गाळयांमध्ये दरवाज्यांची संख्या दोन पेक्षा जास्त नाही. प्राप्त परिणामाच्या आधारे असे निष्कर्ष काढण्यात आले की निम्न उत्पन्न गटातील गाळयामध्ये खिडक्यांची संख्या दोन पेक्षा जास्त नाही. मध्यम आणि निम्न उत्पन्न गटातील गाळयांच्या बाहेरील दृश्य आकर्षक नाही. निम्न उत्पन्न गटातील गाळयामध्ये संक्रमण मार्गाची सोय नाही. त्यामुळे तेथील खोल्यांमध्ये एकांत मिळत नाही. प्राप्त परिणामाच्या आधारे असे निष्कर्ष काढण्यात आले की निम्न उत्पन्न गटातील गाळयांमध्ये कपाटाची सोय नाही. तसेच मध्यम आणि निम्न उत्पन्न गटातील गाळयांच्या खोल्या समुहबध्द नाहीत निम्न, मध्यम गटातील गाळयांमध्ये फर्निचरची सोय नाही. मध्यम आणि निम्न उत्पन्न गटातील गाळयांचा दर्शनीय भाग आकर्षित नाही.

निम्न, आणि मध्यम उत्पन्न गटातील गाळे गृहआयोजन सिध्दांताप्रमाणे असतात, हया गृहितकाचा स्विकार करता येणार नाही. परिणामाच्या आधारे असे निष्कर्ष काढण्यात आले की स्वच्छतेच्या दृष्टिने स्वयंपाक घर, स्नान कक्षात चोवीस तास पाण्याची सोय असावी परंतु असे निदर्शनास येते मध्यम उत्पन्न गटातील गाळयांमध्ये पाण्याची सोय आहे. निम्न, उत्पन्न गटात गटातील गाळयामध्ये चोवीस तास पाण्याची सोय नाही. परंतु निम्न, उत्पन्न गाळयात नाही. मध्यम आणि निम्न उत्पन्न गटातील गाळयांमध्ये सांडपाण्याची सोय सारखीच आहे. मत सारखे आहेण निम्न, मध्यम गटातील गाळयांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय महानगरपालिका द्वारे पूर्ण केलेली आहे. मध्यम उत्पन्न गटातील गाळयांमध्ये नैसर्गिक आणि कृत्रिम प्रकाशाची सोय उत्तम आहे निम्न, मध्यम उत्पन्न गटातील गाळयांमध्ये प्रकाश

व वायुविजनाची व्यवस्था ही पर्याप्त आहे. गाळयांमध्ये प्रकाश व वायुविजनाची व्यवस्था सारखीच आहे. असे निष्कर्ष काढण्यात आले की निम्न, मध्यम गटातील गाळेधारकांचे सारखेच मत आहे.

प्राप्त परिणामाच्या आधारे, निम्न, मध्यम उत्पन्न गटातील गाळयांमध्ये प्रकाश व वायुविजनाचा अभाव आढळत नाही. हे गृहित के स्विकार करण्यात आले. निम्न, मध्यम उत्पन्न गटातील गाळयांजवळ षाळा-कॉलेजची सोय आहे. मुलांना शिक्षणासाठी खुप दूर जावे लागत नाही कारण म्हाडाच्या गाळयांच्या जवळपास शिक्षणाची सोय आहे. निम्न, मध्यम या गाळेधारकांचे मत सारखेच आहे.निम्न, मध्यम उत्पन्न गटातील गाळयांजवळ शाळा, कॉलेजची सोय आहे. हे गृहित के स्विकार करण्यात आले

***सूचना / शिफारशी***

1) *निम्न आणि मध्यम उत्पन्न गटातील गाळयांचे बांधकाम करतांना गृहआयोजन सिध्दांताचा आवश्यक ठिकाणी उपयोग करावा.*

2) *निम्न आणि मध्यम उत्पन्न गटातील खोल्यांची योजना समुहबध्द असायला हव्यात, त्याप्रमाणे त्यांचे आयोजन करावे.*

3) *मध्यम गाळयांमध्ये फर्निचरची सुविधा देण्यात यावी.*

4) *निम्न उत्पन्न गटातील गाळयांमधील स्वयंपाक खोली, स्नानकक्ष आणि शौचालयात चोवीस तास पाण्याची सोय असावी.*

5) *निम्न, मध्यम उत्पन्न गटातील गाळयांची अभिमुखता आकर्षक राहील. याप्रमाणे आयोजन करावे*

6) *निम्न आणि मध्यम उत्पन्न गटातील गाळयांमध्ये दरवाजे आणि खिडक्यांची संख्या वाढवावी.*